ePaper

## “इम्रान खान यांची अटक बेकायदेशीर, ”: सुप्रीम कोर्ट



| वर्ष - 7 | अंक -16 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 12 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- पुण्यासाठी नवी पालिका कधी?
- विदेशी वाहनांची ‘क्रेझ’ : गेल्या वर्षात ३०९ परदेशी वाहनांची आयात


## मंत्रिमंडळाच्या विस्तार झाल्यास पिंपरी-चिंचवडमधून

# आ. महेश लांडगे यांना मंत्रीपदाची संधी!

### गेल्या काही महिन्यांपासून रखडलेल्या मंत्रिमडळ विस्ताराचा मार्गही मोकळा

| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातून शिंदे-फडणवीस सरकारला कोणताही धोका नसल्याचे स्पष्ट झाल्याने गेल्या काही महिन्यांपासून रखडलेल्या मंत्रिमडळ विस्ताराचा मार्गही मोकळा झाला आहे. या पार्श्वभूमीवर पुणे, पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण भागातून मंत्रिमंडळात कोणाला संधी मिळणार, याबाबतची चर्चा सुरू झाली आहे. सध्या मंत्रिमंडळात कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील यांचा समावेश असून माधुरी मिसाळ आणि भीमराव तापकीर, सुनील कांबळे यांची नावे पुण्यातून चर्चेत आहेत. पिंपरी-चिंचवडमधून आमदार महेश लांडगे तर जिल्ह्यातून राहुल कुल यांना संधी मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.**





सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर मंत्रिमंडळाचा विस्तार येत्या काही दिवसांत होईल, अशी चर्चा सुरू झाली आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांची आगामी निवडणूक लक्षात घेऊन या दोन्ही शहराला मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे. मंत्रिपदाच्या शर्यतीमध्ये पुणे आणि पिंपरीसह जिल्ह्यातील आमदार उत्सुक असले तरी मंत्रिमंडळ विस्तारात धक्कातंत्र वापरले जाणार की, आगामी निवडणूक लक्षात घेऊन मंत्रीपद आणि राज्यमंत्रीपद दिले जाणार, याबाबत चर्चा सुरू झाली आहे.

जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदार संघामध्ये १२ मतदारसंघात राष्ट्रवादी आणि काँग्रेसचे आमदार आहेत. तर उर्वरित नऊ मतदारसंघात भाजपचे आमदार आहेत. ठाकरे गटाचा एकही आमदार जिल्ह्यात नाही. जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, सहकार, शिक्षण संस्थांवर राष्ट्रवादी काँग्रेस-काँग्रेसच वर्चस्व आहे. जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाचा प्रभाव वाढवायचा असेल तर जिल्ह्यातून मंत्रिपद द्यावे लागणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांना टक्कर देणारा नेता जिल्ह्यातून मंत्रीपदाच्या शर्यतीत असेल, अशी चर्चा आहे.

### मंत्रीमंडळात यांच्या नावाचा होऊ शकतो विचार

पिंपरीतून आमदार महेश लांडगे आणि दौंडचे आमदार राहुल कुल यांना मंत्रीपद मिळेल, अशी चर्चा भारतीय जनता पक्षाच्या वर्तुळात आहे. या तिघांची बलस्थाने आणि त्यांच्यापुढील आव्हाने काय आहेत, याचा मंत्रिपद देताना विचार केला जाईल. पर्वती विधानसभा मतदारसंघातून तीन वेळा निवडून आलेल्या माधुरी मिसाळ यांनाही मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे. पुण्यातून अद्यापही महिला आमदाराला मंत्रिपद मिळालेले नाही. भाजपचे सरकार असताना मिसाळ मंत्रिपदासाठी आग्रही होत्या.

### भाजपने धक्कातंत्राचा अवलंब केल्यास...

मात्र भाजपने धक्कातंत्राचा अवलंब केल्यास शिवाजीनगर मतदारसंघाचे आमदार आणि फडणवीस यांचे समर्थक सिद्धार्थ शिरोळे यांचा तर जातीय समीकरणे जुळविण्यासाठी सुनील कांबळे यांच्या नावाचाही विचार होण्याची शक्यता आहे. दौंड मतदारसंघातून निवडून आलेले राहुल कुल यांना जिल्ह्यातून संधी मिळेल, असा अंदाज आहे. राहुल कुल यांनी २०१४ मधील निवडणूक राष्ट्रीय समाज पक्षाच्या तिकिटावर तर २०१९ मध्ये भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर जिंकली होती.

# महापालिकेत स्थापन होणार शाश्वत विकास कक्ष

### महापालिका तसेच विविध विभाग व संस्थांचे अधिकारी, पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

|पिंपरी-चिंचवड |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत "शाश्वत विकास कक्ष" सुरू करण्यात येणार आहे, याद्वारे पर्यावरण संवर्धन हवा,पाणी,ध्वनी प्रदूषण हरितीकरण, जैवविविधता, घनकचरा, आरोग्य, वाहतूक,एनर्जी कार्बन एमिशन, क्लायमेट चेंज सस्टेनेबल डेव्हलपमेंट, इकोसिस्टीम,



ग्रीन बिल्डींग नदी पुनरुज्जीवन जलस्त्रोत पुनरुज्जीवन आदी घटकांचा विचार करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

### महापालिका आयुक्तांनी केले मार्गदर्शन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिका अधिकारी, शासकीय अधिकारी, विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी यांची एकत्र बैठक महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत मधुकरराव पवळे सभागृह येथे आयोजित करण्यात आलेली होती. या बैठकीस उपस्थितांना मार्गदर्शन करताना आयुक्त सिंह बोलत होते. यावेळी महापालिका आणि विविध विभाग व संस्थांचे अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीचे प्रास्तविक अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ यांनी तर सूत्रसंचालन आणि आभार जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी मानले.

# पुण्यासाठी नवी पालिका कधी?

## सर्वच राजकीय पक्षांकडून पुणेकरांच्या 'वाटण्याच्या अक्षता'

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या वर्षी मे महिन्यात इचलकरंजी महानगरपालिका निर्माण झाली, तर यंदाच्या मे मध्ये जालना महानगरपालिका स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे; पण पुणेकरांसाठी नवी महानगरपालिका स्थापन करण्यास मात्र कोणत्याच राज्य सरकारला वेळ मिळत नाही. त्यामुळे ३४ गावे पुणे महापालिका हद्दीत घेतली जातात, त्यातील दोनच गावे वगळून नगर परिषदेचा उद्देश जाहीर केला जातो; पण फक्त महापालिकेसाठी राजकीय इच्छाशक्ती 'एकसंध' राहात नसल्याने पुणेकरांना सत्तेतील सर्वच पक्ष केवळ 'वाटाण्याच्या अक्षता'च हाती देतात, हे स्पष्ट झाले आहे.**




पुण्यासाठी स्वतंत्र महापालिका स्थापन करण्याची मागणी गेल्या आठ वर्षांपासून केली जात आहे. पुण्याच्या पूर्व भागासाठी ही महापालिका व्हावी, अशी जवळपास सर्वच राजकीय पक्षांतील प्रमुख नेतेमंडळींची इच्छा आहे. मात्र, स्थानिक नेतेमंडळींच्या मागणी किंवा आग्रहाला कोणताच पक्षाचे वरिष्ठ नेतृत्व किंमतच देत नसल्याने पुण्यासाठीच्या स्वतंत्र महापालिकेचा विषय काही दिवसांपुरचा चर्चिला जातो; पण त्यावर ठोस निर्णय कधीच होत नाही. पुणे महापालिकेची हद्द आणि त्या लगतचा सर्वच परिसर झपाट्याने विकसित होत असल्याने स्वतंत्र महापालिकेची गरज असल्याकडे सर्वप्रथम 'महाराष्ट्र टाइम्स'ने लक्ष वेधले होते. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण-उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या काळात कोणत्या भागांसाठी वेगळी महापालिका करता येईल, याचा अहवाल देण्याच्या सूचना नगरविकास विभागाला केल्या गेल्या होत्या. त्यानंतर झालेल्या सत्तांतरात भारतीय जनता पक्ष-शिवसेना युतीचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वेगळ्या महापालिकेसाठी पावले टाकली होती. मात्र, भाजपच्या स्थानिक नेत्यांमुळे त्या वेळी वेगळी महापालिका होऊ शकली नाही. परंतु, पालिका हद्दीलगतची ११ गावे पालिकेत समाविष्ट केली गेली.

### काही कळीचे मुद्दे

- » पुणे महापालिकेचा अर्थसंकल्प सध्या आठ हजार कोटी रुपयांच्या पुढे आहे.
- » पुणे महापालिकेचे विभाजन करून नवी महापालिका निर्माण झाल्यास त्याला निधी कुठून मिळणार असा प्रश्न उपस्थित केला जातो.
- » महापालिकेचा दर्जा घसरेल, अशी भीती काही राजकीय मंडळींकडून व्यक्त केली जात आहे.
- » सध्या पालिकेत समावेश होऊनही हद्दीलगतच्या ३४ गावांमध्ये विकासकामे पुरेशा वेगाने होत नाहीत, अशी स्थानिकांची तक्रार आहेच.
- » गेल्या काही वर्षांत पनवेल, इचलकरंजी आणि जालना अशा तीन महापालिकांची निर्मिती झाली.

### तुम्हाला काय वाटते?

»पुणे महापालिकेचा वाढता विस्तार पाहता, वेगळ्या महापालिकेची गरज तुम्हाला वाटते का? एकाच महापालिकेवर वाढीव गावांचा बोजा टाकण्याऐवजी पूर्व पुण्यासाठी स्वतंत्र महापालिका करून राज्य सरकारने त्यासाठी निधी द्यावा का? पुणे महापालिकेचा कारभार सध्या प्रशासकाच्या ताब्यात असताना आत्ताच वेगळी महापालिका करणे योग्य ठरेल का? उरुळी-फुरसुंगीसाठी वेगळ्या नगरपरिषदेचा अट्टहास योग्य, की स्वतंत्र हडपसरसह पूर्व पुण्यासाठी वेगळी महापालिका अधिक सयुक्तिक ठरेल? राज्यात इतरत्र भागांत वेगळ्या महापालिका होत असताना राज्य सरकार पुण्याकडे दुर्लक्ष का करते? स्वतंत्र महापालिकेसाठी सर्वपक्षीय राजकीय इच्छाशक्ती कमी पडते का?

---

# विदेशी वाहनांची 'क्रेझ' : गेल्या वर्षात ३०९ परदेशी वाहनांची आयात

## पुण्यात विदेशातून आयात केलेल्या वाहनांना पसंती, दुचाकींची संख्या सर्वाधिक

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यात विदेशातून आयात केलेल्या वाहनांना पसंती मिळत असून, अशा आयात वाहनांमध्ये चारचाकीपेक्षा दुचाकी खरेदीचे प्रमाण अधिक आहे. गेल्या वर्षात पुण्यात ३०९ वाहने विदेतून आयात करण्यात आली. त्यात दुचाकींची संख्या जास्त आहे. याशिवाय या वर्षी आयात केलेल्या दुचाकींची संख्या सर्वाधिक असल्याचेही समोर आले आहे.**






पुण्यात दर वर्षी दोन ते अडीच लाख वाहनांची नोंदणी होत असून, शहरातील वाहनाची संख्या ३२ लाखांच्या पुढे पोहचली आहे. त्यात दुचाकींची संख्या सर्वाधिक आहे. शहराला वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. मात्र, वाहनांची मागणी कमी झालेली नसून, पुणेकरांमध्ये परदेशी बनावटीच्या वाहनांची पसंती वाढत असल्याचे चित्र आहे. गेल्या वर्षात पुण्यात ३०९ परदेशी वाहनांची आयात करण्यात आली. त्यात १६० दुचाकी, तर १४९ चारचाकी गाड्यांचा समावेश आहे.

**कोणत्या वाहनांना पसंती?**

गेल्या काही वर्षात पुण्यात बुलेट गाड्यांचे प्रमाण वाढल्याचे दिसून आले होते. मात्र, बुलेटपेक्षा परदेशी गाड्या आपल्या ताफ्यात असाव्यात, यासाठी कितीही रक्कम मोजण्याची तयारी पुण्यातील गाड्यांच्या शौकिनांनी असल्याचे दिसून येत आहे. दुचाकीबरोबर विदेशी चारचाकी वाहनांच्या खरेदीमध्येही काहीशी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. चारचाकीमध्ये वाहनांत 'बीएमडब्ल्यू', 'ऑडी', 'रेंज रोव्हर' अशा गाड्यांचा समावेश आहे. दुचाकींमध्ये 'हार्ले डेव्हिडसन', 'बीएमडब्लू' आणि 'ड्यूकॅटी'ला पसंती मिळत आहे.



### वीस टक्के सेवा शुल्क

»आयात वाहनांसाठी त्यांच्या किमतीच्या २० टक्के रक्कम सेवा शुल्क म्हणून भरावी लागते. अशा आलिशान गाड्यांना आपल्या पसंतीचा नंबर मिळविण्यासाठी वाटेल ती किंमत मोजण्याचीही या वाहनधारकांची तयारी असल्याचे दिसून आले आहे.

### शुल्क आकारणी कशी होते?

- » आयात केलेल्या वाहनांची नोंदणी आरटीओकडे करावी लागते.
- » चारचाकीसाठी नोंदणी शुल्क पाच हजार रुपये.
- » दुचाकीसाठी तीन हजार रुपये नोंदणी शुल्क.
- » परदेशी गाड्यांना किमतीच्या २० टक्के कर भरावा लागतो.
- » कारची नोंदणी शोरूमच्या माध्यमातूनच केली जाते.

"गेल्या वर्षात पुणे आरटीओकडे परदेशातून आयत केलेल्या वाहनांची संख्या वाढली आहे. यामध्ये कारपेक्षा दुचाकींचे प्रमाण जास्त असल्याचे वाहनांच्या नोंदणीवरून दिसून येत आहे.

- संजीव भोर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे

# पिंपरी-चिंचवडकरांना दिलासा!

## पिंपरी-चिंचवडकरांसाठी आंद्रा धरणातून 50 एमएलडी पाणी उचलण्यास सुरुवात

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी |

**आंद्रा धरणातून सोडलेले ५० दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी प्रतिदिन इंद्रायणी नदीतून घेण्यास पिंपरी-चिंचवड महापालिकेने सुरुवात केली आहे. चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया करून शहरातील समाविष्ट भागाला पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे मागील साडेतीन वर्षांपासून दिवसाआड पाणीपुरवठ्याला सामोरे जाणाऱ्या शहरवासीयांना काहीअंशी दिलासा मिळाला आहे.**

शहराची लोकसंख्या वाढत असताना पाण्याची मागणीही दिवसेंदिवस वाढत आहे. मावळातील पवना धरणातून ५१० तर एमआयडीसीकडून ३० असे ५४० एमएलडी पाणी वितरित केले जात होते. मात्र, शहराच्या विविध भागात अपुरा आणि कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी सुरू होत्या. शहरासाठी मावळ तालुक्यातील आंद्रातून शंभर, तर खेड तालुक्यातील भामा-आसखेड धरणातून १६७ असा २६७ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी कोटा मंजूर आहे. या पाण्यावरील प्रक्रियेसाठी चिखलीत ३०० दशलक्ष लिटर क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र उभारले आहे. या जलशुद्धीकरण केंद्राचे काम पूर्ण होऊन चार ते पाच महिने झाले होते. मात्र, मंत्र्यांना वेळ मिळत नसल्याने जलशुद्धीकरण केंद्राचे उद्घाटन रखडले होते. त्यामुळे पाणी सुरू करण्यात आले नव्हते. अखेर महापालिकेने प्रायोगिक तत्त्वावर ५० एमएलडी अशुद्ध जलउपसा करण्यास सुरुवात केली. इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्यातून पंपाद्वारे पाणी उचलून चिखली जलशुद्धीकरण केंद्रात आणले जात आहे. तेथे प्रक्रिया झाल्यानंतर जलवाहिन्यांद्वारे पाणी शहराला वितरित केले जात आहे.



### पिंपरी-चिंचवडकरांना आंद्राचे पाणी मिळणार

चिखली जलशुद्धीकरण केंद्रांतर्गत तळवडे, चिखली, मोशी, डुडुळगाव, चऱ्होली, दिघी, बोपखेल या गावांसह भोसरीचा काही भाग आणि प्राधिकरण सेक्टर एक ते १६ भागात पाणीपुरवठा केला जाणार आहे. त्यामुळे सद्यःस्थितीत या भागात पुरविले जाणारे पाणी शहराच्या अन्य भागात वितरित केले जाणार आहे.



### भामा-आसखेडच्या पाण्यासाठी तीन वर्षांची प्रतीक्षा

भामा-आसखेड धरणातून मंजूर १६७ दशलक्ष लिटर पाणी येण्यास आणखी किमान अडीच ते तीन वर्षांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. जलवाहिनीद्वारे पाणी आणले जाणार आहे. मात्र, धरणग्रस्त शेतकरी आणि जलवाहिनी टाकली जाणाऱ्या इंदोरी परिसरातील शेतकऱ्यांनी जमिनीच्या मोबदल्यासह अन्य मागण्या मान्य केल्याशिवाय काम होऊ न देण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे काम संथ गतीने सुरू आहे.

> आंद्रा धरणातून मिळालेले पाणी इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्यातून उचलले जात आहे. सध्या प्रतिदिन ५० दशलक्ष लिटर अशुद्ध जलउपसा करून प्रायोगिक तत्त्वावर पाणी वितरण सुरू केले. टप्प्याटप्प्याने त्यात वाढ केली जाणार आहे. जुन्या व नवीन जलवाहिन्यांद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.
>
> – श्रीकांत सवणे, सहशहर अभियंता, पाणी पुरवठा विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

---

# चिंचवडमध्ये भेसळयुक्त ५४६ किलो पनीर जप्त

## कारखान्यावर छापा, चार लाख 66 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

|पिंपरी | महाईन्यूज |

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्ताच्या खंडणी विरोधी पथकाने भेसळयुक्त पनीर तयार करणाऱ्या कारखान्यावर छापा घातला. त्यात ५४६ किलो भेसळयुक्त पनीरसह चार लाख ६६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. डेअरीचे मालक साजीद मुस्तफा शेख (वय ३२ रा. पडवळनगर थेरगाव), जावेद मुस्तफा शेख (वय ३८), राकेश श्रीबुद्धराम सिंग (वय २६), अल्ताफ हजरतद्दीन शेख (वय २७), अभिषेककुमार योगेशबाबु यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.**



पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्ताच्या खंडणी विरोधी पथकाने भेसळयुक्त पनीर तयार करणाऱ्या कारखान्यावर छापा घातला. त्यात ५४६ किलो भेसळयुक्त पनीरसह चार लाख ६६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. डेअरीचे मालक साजीद मुस्तफा शेख (वय ३२ रा. पडवळनगर थेरगाव), जावेद मुस्तफा शेख (वय ३८), राकेश श्रीबुद्धराम सिंग (वय २६), अल्ताफ हजरतद्दीन शेख (वय २७), अभिषेककुमार योगेशबाबु यादव (वय २२) आणि सर्फराज शराफतउल्ला शेख (वय ३५ सर्व रा. चिंचवड) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. भेसळयुक्त पदार्थांची विक्री करणाऱ्या व्यावसायिकाची माहिती काढून कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्तांनी दिले होते. त्यानुसार खंडणी विरोधी पथकाचे पोलीस तळेगाव दाभाडे, चिंचवड पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करत होते.

---

# औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी घेतले हृदयविकाराच्या झटक्यातून बचावाचे धडे

|पिंपरी | महाईन्यूज |

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, वायसीएम रुग्णालय, स्मार्ट सिटी व अखिल भारतीय भूलतज्ञ संघटना (सोसायटी ऑफ ऍनेस्थेसियोलॉजिस्ट) पिंपरी चिंचवड शाखेच्या वतीने औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अजंठा नगर येथे हृदयविकाराच्या झटक्यासारख्या आपत्कालीन परिस्थितीत एखाद्या व्यक्तीचे प्राण कसे वाचवायचे याचे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने सहभाग घेतला.**



आरोग्य जनजागृती कार्यक्रमातंर्गत घेण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यशाळेत हृदयविकाराचा झटका, शॉक, अपघात इ. मार्गदर्शक तत्त्वांनुसार सीपीआर / सीओएलएस कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये वायसीएम रुग्णालयाचे उपअधीक्षक तथा भूलतज्ज्ञ मा. डॉ. उज्वला अंदुरकर, मा. डॉ. मनीषा सूर्यवंशी यांनी प्रत्यक्ष प्रशिक्षण देवून विद्यार्थ्यांना "अवयव दान" या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य शशिकांत साबळे, गटनिदेशक ए. एस. मोरे, एस. बी. पावडे, शिल्पनिदेशक डी. एस. वानखेडे, श्री. ऐवले, श्री. गुरव यांच्यासह मनपा अधिकारी व स्मार्ट सिटीचे प्रतिनिधी बिनीश सुरेंद्रन, जस्टीन मॅथ्यू, किरण लवटे यांचेसह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सहभागी विद्यार्थ्यांना मॅनेक्विनवर प्रशिक्षण देण्यात आले. प्रत्येक नागरिकाला जीवनरक्षक बनविणे हेच ध्येय समोर ठेवून ॲनेस्थेसियोलॉजिस्टद्वारे सामान्य नागरिकांसाठी विनामूल्य जागरूकता कार्यक्रम घेण्यात येतो. प्रत्येक नागरिक जीवन वाचवू शकतो. या उद्देशाने सोसायटी ऑफ ॲनेस्थेसियोलॉजिस्ट पिंपरी चिंचवड (एसएपीसी) इंडियन सोसायटी ऑफ ॲनेस्थेसियोलॉजिस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने कंप्रेशन ओन्ली लाईफ सपोर्टबाबत जनजागृती करण्यात येत आहे.




# गड राखला; पण...



सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने विद्यमान सरकारास जीवदान दिले असले तरी उद्याच्या राजकीय लढाईसाठी विरोधकांहाती अधिक शक्तिशाली शस्त्रे दिली हे लक्षात घ्यावयास हवे..

राज्यघटनेने घालून दिलेल्या मर्यादांचा आदर करायचा असल्याने सर्वोच्च न्यायालय महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाबाबत गुरुवारी दिला त्यापेक्षा कोणताही वेगळा निर्णय देऊ शकत नव्हते. स्वत: मर्यादांचे पालन करीत असताना अन्य घटनात्मक यंत्रणांनी केलेला मर्यादाभंग तितक्याच समर्थपणे दाखवून द्यावयाचा असेल तरीही यापेक्षा वेगळा आणि उत्तम निर्णय अन्य कोणता असू शकत नाही. या प्रकारचा ऐतिहासिक आणि पक्षीय फोडाफोडीच्या गलिच्छ गटारगंगेस बांध घालू शकेल असा निर्णय दिल्याबद्दल सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड आणि घटनापीठातील त्यांच्या अन्य चार सहकारी न्यायाधीशांचे मन:पूर्वक अभिनंदन. हा निर्णय एकमताने होता. म्हणजे घटनापीठातील अन्य कोणत्याही न्यायाधीशास यापेक्षा काही वेगळे मांडावयाचे नव्हते. हीदेखील कौतुकाची बाब. या निर्णयाने सर्वोच्च न्यायालयाने आपला आब राखला, प्रतिष्ठा दृढ केली आणि न्यायपालिका कशी असायला हवी, हे दाखवून दिले. हे सोपे नव्हते. कारण सर्वोच्च न्यायालयावर असलेला अपेक्षांचा डोंगर. राज्यातील आणि केंद्रातील सत्ताधीशांस आपण केले ते सर्वार्थाने योग्य असे वाटत होते आणि सत्ता गेलेल्या शिवसेना-राष्ट्रवादी-काँग्रेस हे सर्वोच्च न्यायालयाकडे आपला एकच त्राता, तारणहार या नजरेतून पाहात होते. या दोहोंच्या अपेक्षा पूर्ण करणे हे अर्थातच सर्वोच्च न्यायालयाचे काम नव्हे. पण तरीही न्याय करताना कोणावर अन्यायी होणार नाही; हेदेखील पाहणे तितकेच गरजेचे होते. नपेक्षा 'तळे राखील तो पाणी चाखील' या उक्तीनुसार सत्तेची तळी राखणाऱ्यांस इतरांच्या 'पाणी चाखण्या'च्या अधिकारावर गदा आणण्याची संधी मिळाली असती. हा धोका सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालाने टळला. म्हणूनही तो अभिनंदनीय. आता प्रत्यक्ष निकालाविषयी.

राज्यपाल, विधानसभेचे अध्यक्ष आणि निवडणूक आयोग या तीन महत्त्वाच्या घटनात्मक यंत्रणांनी कर्तव्यात कसूर केल्याचे नग्न सत्य हा निकाल अधिकृतपणे सादर करतो. या तीनही यंत्रणांवरील व्यक्तींचे वर्तन राजकारण-निरपेक्ष असायला हवे आणि ते तसे असते असे आपल्याकडे मानण्याची प्रथा आहे. पण प्रत्यक्षात या यंत्रणांवरील व्यक्ती अन्य कोणत्याही लोकप्रतिनिधींइतक्याच चांगल्या-वाईट असू शकतात हे आजचा निकाल नि:संदिग्धपणे नमूद करतो. अलीकडे विविध राजभवनांत पिटक्या-पिटक्या व्यक्तींना बसवून त्या कठपुतळ्यांकरवी राजकारण करण्याची प्रथा चांगलीच रूढ झालेली आहे. महाराष्ट्राचे माजी महामहीम भगतसिंग कोश्यारी हे अशा नामवंतांतील एक. त्यांच्या कार्यकालातील घटनात्मक पायमल्लीचे वाभाडे 'लोकसत्ता'ने अनेक संपादकीयांतून ('राजभवनातील राधाक्का' (१ ऑगस्ट २०२२), 'राजभवनातील राधाक्कांना रजा' (१४ फेब्रुवारी २०२३) इ.) काढल्याचे अनेकांस स्मरेल. सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाचा महाराष्ट्राविषयीचा निर्णय त्या सार्‍यांवर एका अर्थी शिक्कामोर्तब करतो. 'नसलेल्या अधिकारांचा वापर' राज्यपालांनी केला आणि पक्षीय फाटाफुटीची शहानिशा करण्यासाठी विधानसभा हे व्यासपीठ असू शकत नाही, इतक्या तडफदारपणे सर्वोच्च न्यायालय महामहिमांचे वाभाडे काढते. त्या वेळी हे सर्व निर्णय अर्थातच महामहिमांनी स्वबुद्धीने घेतले असे मानणे दूधखुळेपणाचे ठरावे. राज्यपालांच्या नियुक्त्या गृह मंत्रालयाकडून होतात. तेव्हा महाराष्ट्राचे असो वा तमिळनाडूचे वा पश्चिम बंगालचे. हे सर्व महामहीम गृह मंत्रालयाच्या तालावर नाचतात हेही या निर्णयातून सूचित झाले. 'राजकीय मैदानात उतरण्याचा अधिकार राज्यपालांस नाही,' असे जेव्हा सर्वोच्च न्यायालय म्हणते तेव्हा त्याचा अर्थ या महामहिमांनी तसा उद्योग केला आणि गृह मंत्रालयाने त्यास काहीही आक्षेप घेतला नाही, हाच असतो.

त्याच वेळी सर्वोच्च न्यायालय विधानसभाध्यक्षांच्या प्रमादांबाबतही इतक्याच कठोरपणे भाष्य करते. विद्यमान विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर हे राष्ट्रवादी, शिवसेना असा प्रवास करून सध्या भाजपत स्थिरावले आहेत. तेव्हा त्यांच्या राजकीय चातुर्याबद्दल अधिक भाष्य करण्याची गरज नाही. त्या चातुर्यामुळेच भाजपने ऐन मोक्याच्या प्रसंगी त्यांच्याकडे विधानसभाध्यक्ष पदाची धुरा दिली. नार्वेकरांनी भाजपच्या अपेक्षांस तडा जाऊ दिला नाही. त्यांची त्यासाठीची पहिली कृती होती ती एकनाथ शिंदे गटाच्या आमदारास अधिकृत प्रतोदाचा दर्जा देणे. आमदारांच्या विधानसभा वर्तनात या प्रतोदाची भूमिका महत्त्वाची असते. कारण त्याच्या आदेशाचा भंग करणाऱ्याची थेट अपात्रता निश्चित. उद्धव ठाकरे पायउतार झाल्यानंतर आणि शिंदे मुख्यमंत्रीपदी आरूढ झाल्यावर त्यांस विधानसभेत बहुमत सिद्ध करणे आवश्यक होते. तसा आदेश ठाकरे गटाचा प्रतोद देणे अशक्य. म्हणून शिंदे गटास स्वत:चा स्वतंत्र प्रतोद हवा होता. ती उणीव नार्वेकरांच्या सहकार्याने भरून निघाली. वास्तविक कायदा असे सांगतो की प्रतोदपदाची नियुक्ती ही राजकीय पक्षाच्या विधिमंडळ शाखेकडून होत नाही. ती संघटनेमार्फत होते. या सत्याकडे पूर्ण डोळेझाक करीत या सभापतींनी शिंदे गटाच्या आमदारांस प्रतोदपदी मान्यता दिली. पण विधानसभाध्यक्षांचा हा निर्णय पूर्णपणे बेकायदा असल्याचे सर्वोच्च न्यायालय निकालात म्हणते. इतकेच नव्हे तर यामुळे आमदारांच्या अपात्रतेबाबतचा निर्णय त्यांनी 'रास्त वेळेत' घ्यावा असेही सरन्यायाधीश बजावतात. यातील पाचर अशी की हा निर्णय अध्यक्ष महोदयांस ठाकरे गटाच्या प्रतोदानुसार घ्यावा लागेल.

## संपादकीय »

### मर्यादांचे भान देणारा निकाल

***"लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या सरकारला अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार दिला नाही, तर जबाबदारीच्या तिहेरी साखळीचे तत्त्व निरर्थक ठरेल," इतक्या स्पष्ट शब्दांत 'दिल्ली राजधानी क्षेत्र सरकार वि. भारत सरकार' या प्रकरणातील निकाल देणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाचे अभिनंदन करण्याआधी दोन बाबींची कबुली दिली पाहिजे. .***

लोकशाहीच्या या मूलभूत आणि साध्या तत्त्वाची आठवण करून देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयातील पाच सदस्यांचे घटनापीठ आवश्यक ठरले, यातून आपली राजकीय अधोगतीच दिसून येते ही पहिली कबुली; तर या निकालानंतरही दिल्लीच्या उपराज्यपालांकरवी चालवले जाणारे राजकारण थांबेलच याची शाश्वती नाही, ही दुसरी कबुली. आजार अतिमद्यपानामुळेच बळावतो आहे पण रोगी मद्यपान सोडण्यास तयार नाही, अशा स्थितीत निष्णात डॉक्टरांनी योग्यच औषधे लिहून दिल्यास जे काही होऊ शकते, तसे तर या निकालानंतर दिल्लीचे होणार नाही ना, या प्रकारची शंका अनेकांना असू शकते.

**तुम्ही कुठे जन्म घेता याला निव्वळ अपघातापलीकडे फार महत्त्व नसते. मृत्यूकालीन लौकिक ही तुमची खरी मिळकत समजली जाते. जगण्याचे निकष काय असावेत, याविषयी जगात अनेक प्रवाद आहेत. असे असले, तरी कीर्तीरूपी उरण्याचा खटाटोप सोडून, अनेक भणंग माणसे आपल्या मग्नतेत जगत असतात.**

# नवा राजा, नव्या अपेक्षा...



त्यांच्या जगण्याला व्यवहाराचा स्पर्शही नसतो. काही घराणी मात्र परंपरांचा वारसा मिरवित, स्वयंघोषित लालसा प्रजेवर लादत असतात. सम्राट आणि सोशिकांचे पंथ म्हणूनच भिन्न असतात. लोकमनातील नेतृत्व, ही तुलनेने अलीकडे अस्तित्वात आलेली व्यवस्था आहे. जगभरात लोकशाहीचा पंथ प्रशस्त होताना, राजेशाही हवी कशाला, असा प्रश्न त्यातून उपस्थित केला जातो. राजपरिवाराला आदर-सन्मान देणारी मानसिकता संपली, अशातला भाग नाही. फक्त ब्रिटनच नव्हे, तर जपानपासून ओमानपर्यंतच्या विविधवंशीय देशांत राजेशाही कायम आहे. तब्बल सात दशकांची राजसत्ता भोगून राणी एलिझाबेथ द्वितीय यांचे अलीकडेच देहावसान झाले. ब्रिटनच्या सिंहासनावर राजे चार्ल्स तृतीय यांचा भव्यदिव्य राज्याभिषेक सोहळाही पार पडला. तेथील जामानिमा वलयांकित असतो. बहुतांश पिढीही राजशिष्टाचाराबाबत कमालीची एकनिष्ठ असते. राजघराण्याच्या झगमगाटावर कोट्यवधींचा खर्च झाला, तरी बेहत्तर; मात्र खानदानी परंपरेला तडा जाऊ न देण्याची धारणा ब्रिटनमध्ये आत्मीयतेने जपली गेली. आपले खानपान, संस्कृती, वारशाबद्दल ते केवळ दक्ष आहेत असे नाही, तर ही कीर्ती जगभरात पोहोचावी, या श्रद्धेतून त्यांची धडपड सुरू असते. राजानियंत्रित लोकशाहीचा मार्ग ब्रिटनने निवडला, तो त्यातूनच.

सन १९३७ नंतर ब्रिटनला पहिल्यांदाच राजा लाभला. नवे राजे ७४ वर्षांचे आहेत. त्यांच्यासोबत राणी म्हणून त्यांची पत्नी कॅमिला यांचेही पदग्रहण झाले. भारतीय वंशाचे ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांनी बायबलचे पठण करून, नवसम्राटांचे अभीष्टचिंतन केले. जगभरातील पर्यटन ओढणारे हुकमी नाणे म्हणून या राजघराण्याकडे बघितले जाते. राज्याभिषेकानंतर राजे चार्ल्स आणि राणी कॅमिला चार हजार किलोग्रॅम सोन्यापासून तयार केलेल्या शाही बग्गीत आरुढ होऊन, बकिंगहम राजवाड्यात रवाना झाले. जगातील ३९ देशांच्या चार हजार सैन्यकर्मींनी त्या वेळी मानवंदना दिली. ही उपस्थिती राजवंशासोबतची जगाची जवळीक उघड करणारी आहे. राजेशाहीचे थेट नायकत्व अमान्य असले, तरी लोकनिर्वाचित संसदेला आदेश देणाऱ्या एखाद्या तटस्थ; तरीही सर्वोच्च संस्थेबद्दलचा हळवा कोपराही त्यातून अधोरेखित होतो. 'गॉस्पेल क्वॉयर' हे धार्मिक समूहगान सुरू असताना, 'टॉवर ऑफ लंडन'मधून दिल्या गेलेल्या तोफांची सलामी ज्यांच्या कानी निनादली असेल, त्यांना ब्रिटनच्या राजघराण्यापुढील आव्हानांची सूरही भविष्यात ऐकावा लागेल.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शिंदेंना सत्ता, ठाकरेंना बळ!

## सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे सरकार सुरक्षित

।अमरावती । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या राज्यातील सत्तासंघर्षावर आज, गुरुवारी सर्वोच्च न्यायालय निकाल देणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसह शिवसेनेच्या १६ आमदारांच्या अपात्रतेसह सत्तासंघर्षातील महत्त्वाच्या घडामोडींची घटनात्मक वैधता निश्चित होणार आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय घटनापीठ सकाळच्या वेळात राज्य सरकारचे भवितव्य ठरविणारा हा महत्त्वाचा निकाल देईल. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय घटनापीठ सकाळच्या वेळात राज्य सरकारचे भवितव्य ठरविणारा हा महत्त्वाचा निकाल देईल.



### आमदार अपात्रतेचा मुद्दा पुन्हा विधानसभा अध्यक्षांकडे सत्तांतर प्रक्रियेवर मात्र परखड ताशेरे

नवी दिल्ली : शिंदे गटाच्या १६ आमदारांना अपात्र ठरवण्यास नकार देतानाच त्याबाबत विधानसभा अध्यक्षांनीच निर्णय घ्यावा, असा आदेश देत सर्वोच्च न्यायालयाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना गुरुवारी दिलासा दिला. त्याच वेळी सत्तांतराच्या घडामोडींदरम्यान राज्यपालांनी केलेल्या हस्तक्षेपावर ताशेरे ओढतानाच 'उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिला नसता तर त्यांना मुख्यमंत्रीपदी पुनस्थापित करण्याचा विचार केला असता' असेही न्यायालयाने म्हटले. त्यामुळे शिंदे सरकार सुरक्षित राहिले असले तरी, न्यायालयाने सत्तासंघर्षावर दिलेल्या निकालाने उद्धव ठाकरे यांना राजकीयदृष्ट्या बळ मिळाले आहे.

हा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांसह विधानसभा अध्यक्ष आणि निवडणूक आयोग यांनी घेतलेल्या भूमिकांवरही प्रश्न उपस्थित केले आहेत. त्याच वेळी या खटल्याच्या केंद्रस्थानी असलेल्या नबाम रेबिया निकाल प्रकरणातील त्रुटींवर बोट ठेवत त्याबाबत फेरविचार करण्यासाठी मोठ्या घटनापीठाची नियुक्ती करण्याची घोषणाही सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी केली. उद्धव ठाकरे यांनी तडकाफडकी दिलेला मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा हे शिंदे-भाजप सरकारच्या बचावाचे प्रमुख कारण ठरल्याचे या निकालामुळे स्पष्ट झाले आहे. उद्धव ठाकरे यांनी विधानसभेत बहुमताची चाचणीला सामोरे न जाता मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला पूर्वपरिस्थिती कायम करता येणार नाही, असे सरन्यायाधीशांनी आदेशपत्रात स्पष्ट केले.

### शरद पवारांची एका वाक्यात प्रतिक्रिया

**राज्यात गतवर्षी झालेल्या नाट्यपूर्ण सत्तांतरानंतर शिवसेनेच्या ठाकरे आणि शिंदे गटांकडून सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या होत्या. या सर्व याचिकांची एकत्रित सुनावणी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील न्या. हिमा कोहली, न्या. एम. आर. शहा, न्या. पी. एस. नरसिंहा, न्या. कृष्ण मुरारी या पाच सदस्यीय घटनापीठासमोर झाली. एकूण आठ दिवस झालेल्या युक्तिवादानंतर १६ मार्च रोजी निकाल राखून ठेवण्यात आला होता. गुरूवारी घटनापीठाने एकमताने निकाल दिला. १४१ पानी निकालपत्रात तत्कालिन राज्यपालांची भूमिका, विधीमंडळ पक्षाचे नेते आणि प्रतोद नियुक्ती प्रक्रीयेत विधानसभा अध्यक्षांनी काही बाबींकडे केलेले दुर्लक्ष, निवडणूक आयोगाची स्वायत्तता आदी महत्त्वाच्या मुद्द्यांवर कठोर भाष्य करण्यात आले आहे.**

#### विधानसभाध्यक्षांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

शिंदे गटाने मुख्य प्रतोद म्हणून भरत गोगावले यांची केलेली नियुक्ती व त्याला विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेली मान्यता पूर्णपणे चुकीची होती. शिवसेनेमध्ये फूट पडली आहे, हे नार्वेकर यांना माहित होते. त्यानंतर कोणता गट अधिकृत शिवसेना आहे, हे त्यांनी दोन्ही गटांची सुनावणी घेऊन ठरवायला हवे होते, असे न्यायालयाने आदेशात म्हटले. पक्षप्रतोद ठरवण्याचा अधिकार पक्षसंघटनेचाच असल्याचे न्यायालयाने म्हटले. शिंदे गटाच्या १६ आमदारांना अपात्र ठरवण्याचा निर्णय विधानसभा अध्यक्षांनी योग्य वेळेत घ्यावा, असे आदेश घटनापीठाने दिले.

#### नबाम रेबिया प्रकरण मोठ्या पीठाकडे

शिंदे गटातील आमदारांना अपात्रतेची नोटीस बजावणारे विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्या विरोधात अविश्वासाची नोटीस देण्यात आली होती. या नोटिशीमुळे उपाध्यक्षांचे अधिकार रद्द होतात, असा युक्तिवाद नबाम रेबिया प्रकरणातील निकालाच्या आधारे शिंदे गटाकडून करण्यात आला होता.

---

# "सत्ता बळकवण्यासाठी भाजपाने राज्यपालांनादेखील सोडले

## महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावर आम आदमी पक्षाने पत्रकाद्वारे प्रतिक्रिया

।मुंबई । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

एकीकसर्वोच्च न्यायालय महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावर १६ आमदारांच्या अपात्रतेचा मुद्दा आणि इतर काही याचिकांवर न्यायालय काय निर्णय देणार, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. न्यायालयाच्या निर्णयाबाबत सत्ताधारी आणि विरोधी पक्षाकडून विविध तर्क-वितर्क लावले जात आहेत. अशी एकंदरीत स्थिती असताना कायदेतज्ज्ञ असीम सरोदे यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या संभाव्य निकालावर मोठं भाष्य केलं आहे.

महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाचा निकाल काय लागणार याकडे सगळ्या देशाचं लक्ष होतं. हा निकाल तीन मुद्द्यांवर महत्त्वाचा ठरला. भरत गोगावलेंची नियुक्ती योग्य नाही, अध्यक्षांनी अभ्यास न करता गोगावलेंचं प्रतोदपद मान्य केलं आणि तत्कालीन राज्यपालांची संपूर्ण भूमिका संशयास्पद आहे. असे ताशेरे झाडत निकाल दिला खरा. मात्र १६ आमदार अपात्र आहेत की नाही हे विधानसभा अध्यक्ष ठरवणार आहेत. त्यामुळे निकाल येऊनही सरकारला धोका नाही. हा निकाल आल्यानंतर भाजपावर आपने घणाघाती टीका केली आहे. आम आदमी पक्षाने एक पत्रक काढत भाजपाला सुनावलं आहे.



निवडून आलेले विरोधी सरकार बरखास्त करण्याच्या प्रक्रियेत भाजपाची निर्लज्जपणे सत्ता बळकावणे, राज्यपाल आणि केंद्रीय यंत्रणांना आपल्या बाजूने करुन घेणे, ज्यांना अपात्रतेची नोटीस बजावण्यात आली आहे त्यांच्याकडूनच अध्यक्ष कार्यालयाविरुद्ध अविश्वास ठराव आणणे हे भाजपाचे षडयंत्र होते.

हे खेदजनक आहे की सर्वोच्च न्यायालय स्पष्ट न्याय देण्यास कदाचित कमी पडले. तथापि त्यांनी स्पष्ट केले आहे की राज्यपालांचे वर्तन पूर्ण संशयास्पद होते आणि भाजपाने निवडून आलेल्या सरकारला सत्तेतून उतरवण्यासाठी आणि प्रतिस्पर्धी राजकीय पक्ष नष्ट करण्यासाठी राज्यपाल कार्यालयाच गैरवाप केला. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अध्यक्ष महोदय वेळेत निर्णय घेतील अशी आम्हाला आशा आहे पण स्पष्टपणे सांगायचे तर आमचा भाजपावर फारसा विश्वास नाही. आम्हाला खात्री आहे की जो पक्ष सत्तेत येण्यासाठी ५० कोटी खर्च करु शकतो तो कोणत्याही लोकशाही प्रक्रियेचा अवलंब करुन सत्ता सोडेल अशी शक्यता नाही असंही प्रीती शर्मा मेनन यांनी म्हटलं आहे.

भाजपाचे कुप्रसिद्ध ऑपरेशन कमळ गुप्तपणे केले गेले पण महाराष्ट्रात जे घडले ते ऑपरेशन लोटस २.० आहे. जर हे इथे थांबले नाही तर हे ऑपरेशन लोटस २.० फॉर्म्युला भाजपा विरोधी शासित राज्यांमध्ये कायदेशीररित्या निवडून आलेल्या सरकारांकडून बेकायदेशीपणे सत्ता बळकावण्यासाठी भाजपा वापरेल.

### काय म्हटलं आहे आपच्या पत्रकात?

**'एकनाथ शिंदे महाराष्ट्र सरकार स्थापना' प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल हा भारतीय लोकशाहीला मागे पाडणारा क्षण आहे असे वाटते. राज्यपालांच्या संगनमताने आणि केंद्रीय यंत्रणांच्या पक्षपाताने उद्धव ठाकरेंना ज्या पद्धतीने दूर केले गेले, ते साफ चुकीचे आणि अन्यायकारक होते. असे मत आम आदमी पार्टीच्या मुंबई अध्यक्षा प्रीती शर्मा मेनन यांनी व्यक्त केले.**

# कोलकातामध्ये सलमानच्या 'दबंग टूर'चे आयोजन

बॉलीवूडचा भाईजान अर्थात सलमान खान 'दबंग टूर'च्या माध्यमातून गेली कित्येक वर्ष जगभरात विविध ठिकाणी कार्यक्रम करीत आहे. 'दबंग टूर रिलोडेड एंटरटेनमेंट कॉन्सर्ट'च्या माध्यमातून सलमान खान अनेक दिवसांपासून चाहत्यांचे मनोरंजन करत आहे. आता सलमानच्या आगामी 'दबंग टूर'चे आयोजन कोलकाता येथे करण्यात आले आहे.

सलमान खानला गेल्या काही दिवसांपासून जीवे मारण्याच्या धमक्या येत असल्याने कोलकाता येथील 'दबंग टूर' पुढे ढकलण्यात आली होती. त्याच्या यापूर्वीच्या 'दबंग टूर'चे आयोजन दुबईमध्येही करण्यात आले होते. आता १३ मे रोजी सलमानच्या उपस्थितीत कोलकाता येथील ऐतिहासिक ईस्ट बंगाल क्लबमध्ये 'दबंग टूर' कॉन्सर्ट सोहळा



रंगणार आहे. सलमानच्या या टूरमध्ये चाहत्यांना तिकीट काढून सहभागी होता येणार आहे.

इंडिया टुडेने दिलेल्या माहितीनुसार, येथील वेगवेगळ्या झोनमधून कॉन्सर्टचा आनंद घेण्यासाठी ६९९ ते ३ लाख रुपयांपर्यंतची तिकिटे उपलब्ध आहेत. साध्या तिकिटांचे दर ६९९ रुपयांपासून ते ४० हजारांपर्यंत असून तुम्हाला व्हीआयपी लाउंजमध्ये प्रवेश हवा असल्यास, त्यासाठी तब्बल २ लाख ते ३ लाख रुपये मोजावे लागतील.

सलमान खानसह 'दबंग टूर' कॉन्सर्टसाठी अनेक सेलिब्रिटी हजेरी लावणार आहेत. दिग्दर्शक प्रभू देवा, अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा, पूजा हेगडे, जॅकलीन फर्नांडिस, गायक गुरु रंधावा, अभिनेता आयुष शर्मा आणि मनीष पॉल यांसारखे अनेक कलाकार कोलकातामध्ये सलमानबरोबर परफॉर्म करतील. दरम्यान, दबंग टूरवर असताना सुपरस्टार सलमान खान पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची भेट घेण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात येत आहे.

# सुश्मिता सेन एक्स बॉयफ्रेंडसह पुन्हा रिलेशनशीपमध्ये?

बॉलीवूड अभिनेत्री सुष्मिता सेन नेहमी चर्चेत असते. सध्या ती चित्रपटांपासून दूर असली तरी आपल्या वैयक्तिक आयुष्यामुळे ती नेहमी चर्चेत असते. अलीकडेच एका अवॉर्ड शोदरम्यान सुष्मिता तिचा एक्स बॉयफ्रेंड रोहमन शॉलसोबत स्पॉट झाली होती. यानंतर आता सुष्मिता सेनने रोहमन शॉलसोबतचा एक फोटो शेअर केला आहे. यानंतर चाहत्यांमध्ये रोहमन आणि सुष्मिता सेनच्या पॅच-अपच्या बातम्यांनी जोर धरला आहे.

गुरुवारी सुष्मिता सेनने तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम हँडलवर एक स्टोरी शेअर केली. या स्टोरीत सुष्मिता सेनसोबत तिचा एक्स बॉयफ्रेंड रोहमन शॉल दिसत आहे. सुष्मिता सेनने या फोटोसोबत एक ओळ लिहिली असून, त्यामुळे चाहत्यांची उत्कंठा वाढली आहे. वास्तविक सुष्मिता सेनने या इन्स्टा-स्टोरीत इमोजीसह लिहिले आहे की- छान फोटो रोहमन. सुष्मिता सेन आणि रोहमन शॉलचा हा फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

## सुश्मिताने शेअर केलेली पोस्ट

काही महिन्यांपूर्वी सुश्मिता सेन आणि रोहमनच्या ब्रेकअपची बातमी समोर आली होती. यानंतर



सुश्मिता सेनच्या आयपीएलचे माजी अध्यक्ष ललित मोदीसोबतच्या डेटिंगच्या बातम्यांनी चांगलाच जोर धरला होता. पण आता पुन्हा एकदा सुश्मिता सेन आणि रोहमन शॉल यांच्यातील जवळीक वाढू लागली आहे.

सुष्मिता सेनच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाले तर, आगामी काळात ती 'आर्य ३' या वेबसीरिजमध्ये दिसणार आहे. सध्या सुष्मिता सेन 'आर्य ३'मुळे खूप चर्चेत आहे. या वेबसीरिजच्या मागील दोन सीझनमध्ये तिने अप्रतिम अभिनयातून सर्वांची मने जिंकली आहेत. लवकरच सुष्मिता सेनचा 'आर्य ३' OTT प्लॅटफॉर्म डिस्ने प्लस हॉटस्टारवर प्रदर्शित होणार आहे.

# 'माधुरी तू चुकलीच!' बॉलीवूडची धकधक गर्ल झाली ट्रोल?

बॉलीवूडची धकधक गर्ल ही नेहमीच तिच्या वेगळ्या स्टाईलसाठी चर्चेत असणारी सेलिब्रेटी आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ तिनं आपल्या डान्सनं चाहत्यांना भुरळ घातली आहे. मात्र आता माधुरी ही एका गाण्यामुळे वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. नेटकऱ्यांनी तिच्यावर नाराजी व्यक्त केली आहे.



इन्स्टाग्रामवर एखाद्या व्हिडिओ जास्त प्रमाणात ट्रेंड होत असेल तर त्याची हवा बॉलिवूडला देखील लागते. आणि अशावेळी वेगवेगळे बॉलीवूड सेलिब्रेटी देखील या ट्रेंड वर आपली अदाकारी दाखवतात. बॉलिवूडची धक धक गर्ल आणि उत्तम डान्सर माधुरी दीक्षित देखील इन्स्टाग्रामवरील ट्रेंड गाण्यावर डान्स केला पण युजर्सने तिला जबरदस्त ट्रोल केले आहे. गेल्या काही दिवसांपासून इंस्टाग्रामवर "मेरा दिल ये पुकारे आजा या रिमिक्स गाण्याचा खुप ट्रेंड चालू आहे". आयशा नावाच्या एका पाकिस्तानी तरूणींनी एका लग्नात या गाण्यावर डान्स केला आणि हा व्हिडिओ तुफान सारखा व्हायरल झाला . अनेकजण या गाण्यावर नाचताना दिसत आहे तर माधुरीने देखील या गाण्यावर डान्स केला आणि व्हिडिओ पोस्ट केला पण अनेकांना माधुरीचा डान्स नाही आवडला.


# THE KERALA STORY'मधील मुख्य अभिनेत्री अदा शर्माचं खरं ना?

अभिनेत्री अदा शर्मा सध्या 'द केरला स्टोरी' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटात ती प्रमुख भूमिका साकारत आहे. २००८ साली विक्रम भट्ट यांच्या '१९२०' या हॉरर चित्रपटातून तिने मनोरंजनसृष्टीत पदार्पण केलं. या चित्रपटासाठी तिला सर्वोत्कृष्ट महिला पदार्पण पुरस्कारही देण्यात आला. यानंतर ती बऱ्याच चित्रपटांमध्ये झळकली पण तिचा कोणताही चित्रपट बॉक्स ऑफिसवर जादू दाखवू शकला नाही. अखेर १५ वर्षांनी अदा 'द केरला स्टोरी'मुळे रातोरात स्टार झाली.

'द केरला स्टोरी' हा चित्रपट सध्या चांगलाच चर्चेत आहे. सामान्य प्रेक्षकांनी चित्रपटाला डोक्यावर घेतलं आहे तर काही लोक या चित्रपटाला प्रचंड विरोधही करत आहेत. केरळमधील ३ हिंदू मुली ज्यांचं धर्मपरिवर्तन करून त्यांना आयसीसमध्ये दाखल करण्यात आलं त्यांच्याविषयी हा चित्रपट भाष्य करतो. याबरोबरच इस्लामी कट्टरपंथी लोक, धर्मांतरण, जिहाद अशा वेगवेगळ्या विषयावर चित्रपट भाष्य करतो. यात अदाने शालिनी उन्नीकृष्णन ही भूमिका केली आहे.

मध्यंतरी चित्रपटाच्या प्रमोशन दरम्यान अदाने पावनी मेहरोत्रा या यूट्यूबरला एक मुलाखत दिली होती. या मुलाखतीमध्ये अदा शर्माला तिच्या या साध्या सोप्या नावाबद्दल प्रश्न विचारण्यात आला, की तिला हे नाव नेमकं कसं पडलं. तर यावर उत्तर देताना अदाने तिच्या खऱ्या नावाबद्दलही खुलासा केला. या मुलाखतीमध्ये अदा म्हणाली, "माझं खरं नाव चामुंडेश्वरी अय्यर हे आहे, पण नंतर हे नाव उच्चारण्यासाठीही प्रचंड कठीण असल्याने अदा हे नाव घेणं पसंत केलं." अदाने तेलुगू चित्रपटसृष्टीतही प्रचंड काम केलं आहे. आदाचा पहिला तेलगू चित्रपट 'हार्ट अटॅक' २०१४ साली प्रदर्शित झाला होता. यानंतर अदा शर्माने 'सन ऑफ सत्यमूर्ती', 'राणा विक्रम', 'सुब्रमण्यम फॉर सेल' इत्यादी अनेक साऊथ चित्रपटांमध्ये काम केले. 'द केरला स्टोरी'मुळे तब्बल



१५ वर्षांच्या संघर्षानंतर अदा शर्माच्या अभिनयाचे सगळीकडे कौतुक सुरु आहे.